30614

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक :- 7 OCT 2004

**कार्यालयीन आदेश क्रमांक** 2609 **दिनांक**

विषय :- जिल्हा परिषद वार्षिक लेखे शासनास सादर होण्यास होणाऱ्या विलंबाबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्र.स्था १८/ब/जिप/वाले/अ.अ.१/१० दिनांक.६ जुलै २००४

दिनांक २७ व २८ ऑगस्ट २००४ रोजी संचालक लेखा व कोषागारे, मुंबई येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या विभागीय उपमुख्य लेखापरीक्षक यांच्या बैठकीत उपरोक्त संदर्भाधिन विषयावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालील आदेश देण्यात येत आहेत.

१) उपमुख्य लेखापरीक्षक (व) नागपूर यांनी भंडारा, गोंदिया व गडचिरोली व उपमुख्य लेखापरीक्षक (व) नाशिक यांनी नंदुरबार जिल्हयाचे सन २०००-२००१ चे वार्षिक लेखे तात्काळ शासनास सादर होतील या दृष्टीने प्रयत्न करावेत..

२) सन २००१-२००२ व २००२-२००३ चे ज्या ज्या जिल्हयाचे वार्षिक लेखे प्रलंबित आहेत त्या त्या जिल्हास्तरीय उपमुख्य लेखापरीक्षक आणि संबंधित विभागीय उपमुख्य लेखापरीक्षक यांनी वार्षिक लेखे शासनास तात्काळ सादर होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

३) वार्षिक लेखे शासनास तात्काळ सादर व्हावेत यासाठी वार्षिक लेखे तपासणीसाठी विभागीय उपमुख्य लेखापरीक्षक व जिल्हास्तरीय उपमुख्य लेखापरीक्षक यांचेकडे प्राप्त झाल्यावर ते त्यांनी स्वतःकडे प्रलंबित ठेवू नयेत.

( सी.जी. पवार)
मुख्य लेखापरीक्षक ,
स्थानिक निधी लेखा महाराष्ट्र राज्य

प्रत :-

१) उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा विभाग (सर्व)
२) उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा जिल्हा (सर्व)

B.Microsoft Word aa३ , ११०२००४